नि. फौ. ख. क्र. १६७/२०१८ मधील नि. क्र. ५८ वरील हुकुम

**(सी.एन.आर.नं.:- MHKO110014922018)**

**दिनांक १३/०३/२०२०**

१. अर्ज वाचला, सरकारी वकील यांनी दिलेले म्हणणे वाचले. दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले, संबंधीत पक्षकारचा युक्तिवाद ऐकला.

२. आरोपी क्र. १ यांचे नमुद गन्ह्याकामी त्यांचे स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा कोलोली, जि. कोल्हापूर येथील बचत खाते क्र. ३१९९९४३८४४७ असून सदर खातेवर रक्कम ₹२,९४६/- शिल्लक आहे व कोल्हापूर डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑप. बँक लि., शाखा वारणानगर, जि. कोल्हापूर येथील बचत खाते क्र. ०२३३११००२०००९०५ असून सदर खातेवर रक्कम ₹१९७/- शिल्लक असलेबाबत कथन केलेले आहे. सदर खातेवरील शिल्लक रक्कम अर्जदार यांची स्वकष्टार्जित आहे. त्यामुळे त्यांनी सदरची रक्कम त्यांना आदा करणेबाबत विनंती केली आहे.

३. सरकारी वकीलांनी वर नमुद खातेवरील रक्कम लोकांची फसवणूक करून जमा केल्याची शक्यता असून सदर रक्कम अर्जदार यांना देण्यात येवू नये अशी हरकत घेतली आहे.

४. प्रस्तुत खटल्याचे अवलोकन केले. प्रस्तुत खटल्याकामी पोलीसांतर्फे तपास पुर्ण होवून आरोपी क्र. १ ते ७ यांच्या विरुध्द दोषारोपपत्र दिनांक १२/११/२०१८ रोजी भारतीय दंड संहिता कलम १८६० चे कलम ४०६, ४१६, ४२०, ४६७, ४६८, ४७२ सह ३४ अन्वये न्यायालयात दाखल झालेले आहे. सदर गुन्ह्यातील तपासादरम्यान आरोपी क्र. १ यांचे नमुद स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा कोलोली, जि. कोल्हापूर येथील बचत खाते क्र. ३१९९९४३८४४७ व कोल्हापूर डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑप. बँक लि., शाखा वारणानगर, जि. कोल्हापूर येथील बचत खाते क्र. ०२३३११००२०००९०५ हे सिल करण्यात आले होते. अभियोग पक्षाने सदरचे खाते हे आरोपी क्र. १ चे आहे याबद्दल कोणताही आक्षेप घेतलेला नाही. सरकारी वकीलांच्या कथनाप्रमाणे आरोपी क्र. १ याने दिनांक १७/०५/२०१८ रोजी सदर खातेवर रक्कम ₹४०,०००/- जमा केली होती. परंतू आरोपी हा सदर खातेवरील त्यांची स्वकष्टार्जित रकमेची मागणी करत आहे. तरी प्रस्तुत गन्ह्याचे स्वरूप पाहता व आरोपी क्र. १ यांची विनंती पाहता आरोपी यांचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारित करतो.

## आ दे श

१. अर्ज निशाणी क्र. ५८ मंजूर करण्यात येतो.

२. नियमित फौजदारी खटला क्र. १६७/२०१८ मध्ये जप्त करण्यात आलेले आरोपी क्र. १ चे स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा कोलोली, जि. कोल्हापूर येथील बचत खाते क्र. ३१९९९४३८४४७ खातेवरील शिल्लक रक्कम ₹२,९४६/- (रक्कम रुपये दोन हजार नऊशे शेहचाळीस फक्त) व कोल्हापूर डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑप. बँक लि., शाखा वारणानगर, जि. कोल्हापूर येथील बचत खाते क्र. ०२३३११००२०००९०५ खातेवरील शिल्लक रक्कम ₹१९७/- (एकशे सत्यानऊ) आरोपी क्र. १ यांना देण्यात यावी.

३. आरोपी क्र. १ यांचे स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा कोलोली, जि. कोल्हापूर येथील बचत खाते क्र. ३१९९९४३८४४७ व कोल्हापूर डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑप. बँक लि., शाखा वारणानगर, जि. कोल्हापूर येथील बचत खाते क्र. ०२३३११००२०००९०५ मधील खात्याबाबत जप्तीचा आदेश कायम ठेवण्यात येत आहे.

Chaitanya Sunildatta Deshpande
Digitally signed by Chaitanya Sunildatta Deshpande
Date: 2020.03.13 16:56:18 +0530

ता. १३/०३/२०२०. ( सी. एस. देशपांडे )

पेठ–वडगांव. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेठ–वडगांव.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri. R. P. Moraskar |
| Name of Court | Shri. C. S. Deshpande, Judicial Magistrate First Class, Peth-Vadgaon. |
| Date of Dictation | 13/03/2020 |
| Judgment Signed by the P.O. on | 13/03/2020 |
| Judgment uploaded on | 13/03/2020 |